# प्रेसनोट

दि. १७/०५/२०२४

चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस उप निरीक्षकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

<table>
<tr><td>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक</td><td>पुणे घटक</td></tr>
<tr><td>पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक</td><td>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २३८/२०२४</td></tr>
<tr><td>कलम</td><td>भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७.</td></tr>
<tr><td>तक्रारदार</td><td>पुरूष, वय - ४० वर्षे</td></tr>
<tr><td>आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय</td><td>श्री. दत्तात्रय सर्जेराव शेगर, पोलीस उप निरीक्षक, (वर्ग-२), चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर.</td></tr>
<tr><td>मागणी केलेली लाचेची रक्कम</td><td>५,००,०००/- रुपये</td></tr>
<tr><td>तडजोडीअंती लाच मागणी रक्कम</td><td>३,००,०००/- रुपये</td></tr>
<tr><td colspan="2">पडताळणी दिनांक :- १०/०५/२०२४<br>गुन्हा दाखल दिनांक :- १७/०५/२०२४ रोजी १७.४३ वा.<br>थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे महावितरण विभागात नोकरीस आहेत. तक्रारदार यांचेविरूध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे मिटर चोरीचा गुन्हा दाखल आहे असे लोकसेवक दत्तात्रय शेगर, पोलीस उपनिरीक्षक यांनी तक्रारदार यांना सांगून, सदर गुन्ह्याचा तपास ते स्वतः करीत असल्याचे सांगून सदर गुन्हयामध्ये तक्रारदार यांचेविरूध्द पुढील कारवाई न करण्याकरीता लोकसेवक दत्तात्रय शेगर यांनी ५ लाख रूपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.<br>तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शेगर यांनी तक्रारदार यांचेविरूध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे दाखल असणारे मिटर चोरीचे गुन्हयामध्ये पुढील कारवाई न करण्याकरीता ५ लाख रूपयांची मागणी करून, तडजोडीअंती ३ लाख रुपयांची लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.<br><br>ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्री. रूपेश जाधव हे तपास करत आहेत.</td></tr>
</table>

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.